// १७ //

## भाग १

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालय, मालवण, जि. सिंधुदुर्ग**<br>(पीठासीन अधिकारी श्री.एम.के.फकीह)<br>(अधिघोषित दिनांक २५/०३/२०२६ )<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०२/२०२५ सी.एन.आर.क्र.एमएचएसआय ०७००००१२२०२५ निशाणी क्र.६ लगत** |
| | प्रथम खबर अहवाल गुन्हा क्रमांक – २०१/२०२४<br>पोलीस स्टेशन – मालवण पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे ठाणे प्रमुख<br>मालवण पोलीस स्टेशन, ता. मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्री.एन.एस.कुंटे |
| आरोपी | योगेश सत्यवान पवार,<br>वय – ३३ वर्षे,<br>रा. साळेल नांगरभाट,<br>ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग |
| आरोपीतर्फे वकील | श्री.एच.एल.गोवेकर/टी.पी.चिंदरकर |

## भाग २

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २६/१२/२०२४ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | २६/१२/२०२४ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १०/०१/२०२५ |
| गुन्ह्याचा संक्षेप नोंदवल्याची तारीख | ०५/०८/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २५/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | निरंक |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय तारीख | २५/०३/२०२६ |
| शिक्षा सुनवल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## आरोपीची माहीती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नाव | आरोपी च्या अटकेची तारीख | आरोपीची जामीना वर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चीत करण्यात आलेले गुन्हे | आरोपीची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरवण्यात आले | आरोपीस सुनवण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहिते नुसार संप परिक्षेच्या कालावधी मध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | योगेश सत्यवान पवार | निरंक | निरंक | महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२–अ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

# भाग ३

## अ) अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सिध्देश गुरुदास चिपकर | फिर्यादी |
| २. | संतोष गोविंद जामसंडेकर | घटनास्थळ पंच |
| ३. | प्रकाश गणपतराव मोरे | तपासिक अंमलदार |

## ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| साक्षीदाराचा क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी</u>**

**अ) अभियोग पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | पी१/पीडब्ल्यू१ | फिर्याद |
| २. | पी२/पीडब्ल्यू३ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | पी३/पीडब्ल्यू३ | मुद्देमाल पावती |

**ब) बचाव पक्ष**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन निशाणी**

| अनुक्रमांक | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

# न्या य नि र्ण य

१. आरोपीविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२-अ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले आहे.

२. प्रस्तुत कामी फिर्यादी सिध्देश गुरुदास चिपकर याने दाखल केलेल्या फिर्यादनुसार आरोपीविरुध्द गुन्हा रजि. क्र. २०१/२०२४ दाखल करण्यात आला. त्याच्या तपास पुर्ण झालेनंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल झाले. आरोपी अभियोगाचे कामी हजर झालेनंतर त्यास दोषारोपाचा सारांश समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबूल केला व स्वतःचा बचाव करणार असे सांगितले.

३. अभियोग पक्षाने खटला शाबीत करणेकरीता दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. तसेच अभियोग पक्षाने नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१ फिर्याद, या कागदोपत्री पुराव्याची जोड दिली आहे.

४. अभिलेखावरील पुराव्याआधारे आरोपीचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ (१) (ब) अन्वये जबाब नोंदविला. आरोपीने त्याचे बचावात त्याने गुन्हा केलेला नाही असा बचाव घेतला आहे.

५. सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एन.एस.कुंटे व बचाव पक्षाचे विधीज्ञ श्रीमती टी.पी.चिंदरकर यांचा युक्तीवाद ऐकला.

६. अभिलेखावरील फिर्याद, दोषनिश्चिती व पुरावा याआधारे खटल्याचे निर्णयाकरीता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्द्यावर पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी निष्कर्ष देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, दि. २६/१२/२०२४ रोजी सायंकाळी ०८.०५ वा. मौजे गुरामवाडी तिठ्ठा येथील रविकांत परुळेकर यांचे दुकान गाळयाचे समोरील | |

| | | |
|---|---|---|
| | *// २१ //* रस्त्याचे डावे बाजूस असलेले पान टपरी शेजारी स्वत:चे आर्थिक फायदयासाठी मुंबई मटका नावाच्या जुगाराचे आकडयावर सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळत असताना मिळून आला होता ? | ..... नाही. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे . |

**<u>का र ण मी मां सा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>** :-

७. सा.क्र.२ संतोष जामसंडेकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि.२६/१२/२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना कोठेही बोलविले नव्हते. त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आलेला नाही अगर कोणत्याही वस्तु जप्त केल्या नव्हत्या असे सांगितले आहे. सा.क्र.१ संतोष हे त्यांच्या पूर्व जबाबाशी विसंगत साक्ष देत असल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ताच्यावतीने कलम १५७ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता अनुषंगाने सुचक प्रश्न विचारले असताही सा.क्र. १ संतोष यांच्या पुराव्यात अभियोग पक्षास मदत करणारा कुठलाही पुरावा उपलब्ध झाला नाही.

८. सा.क्र.२ सिध्देश चिपकर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २६/१२/२०२४ रोजी ते कट्टा दुरक्षेत्र येथे असताना विश्वसनिय बातमी मिळाली की, मौजे गुरामवाड येथे एक इसम लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळवत आहे. त्या बातमीवरुन ते, पोहेकॉ १३५ मोरे यांनी पंच गुरुप्रसाद बाळकृष्ण नाईक व संतोष जामसंडेकर यांना बोलापवून घेवून छाप्याची माहिती

दिली, त्यानंतर ते सर्वजण खाजगी वाहनाने गुरामवाडी येथे गेले असता रविकांत परुळेकर यांचे दुकानगाळयासमोरील रस्त्याच्या डाव्या बाजूस पान टपरीच्या शेजारी एक इसम हातातील कागदावर दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन काही तरी लिखाण करत असल्याचे दिसून आले. त्यांची चाहूल लागताच त्या इसमा समोरील दुसरा इसम पळून गेला. घटनास्थळावरील इसमाच्या हातातील कागदांची पाहणी केलीअसता त्यावर मुंबई मटका नावाचे आयताकृती पुस्तक त्यावर कार्बनव्दारे आकडेमोड केलेले दिसत होते, तसेच त्याच्या ताब्यात एक निळया रंगाचे बॉलपेन व रोख रक्कम रुपये २०८०/– मिळून आले. आरोपीने त्याचे नाव योगेश सत्यवान पवार रा.साळेल नांगरभाट ता. मालवण असे सांगितले. मोरे यांनी सर्व मुद्देमाल जप्त केला. सा.क्र.१ सिध्देश यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांनी सदर घटनेबाबत नि.क्र.पी१/पी. डब्ल्यू१ फिर्याद दिली होती असे सांगितले आहे

९. सदर साक्षीदाराने उलट तपासामध्ये छाप्याकामी गेलेल्या खाजगी वाहनाचा प्रकार, नंबर व मालकाचे नाव फिर्यादमध्ये नमूद नसल्याचे तसेच फिर्यादमध्ये ज्या पान टपारीचा उल्लेख केला त्याच्या मालकीबाबत काही खात्री केली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच छाप्याचे ठिकाण लोकवस्तीचा भाग असल्याचे मान्य केले आहे.

१०. सा.क्र.३ प्रकाश गणपतराव मोरे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दि. २६/१२/२०२४ रोजी ते मालवण पोलीस स्टेशन येथे असताना विश्वसनिय बातमी मिळाली की, मौजे गुरामवाड येथे एक इसम लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळवत आहे. त्या बातमीवरुन त्यांनी पंच गुरुप्रसाद नाईक व संतोष जामसंडेकर यांना बोलावून घेतले, त्यानंतर ते व पंच असे खाजगी वाहनाने गुरामवाडी येथे गेले असता रविकांत परुळेकर यांचे दुकानगाळयासमोरील रस्त्याच्या डाव्या बाजूस पान टपरीच्या शेजारी एक इसम हातातील कागदावर

दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन काही तरी लिखाण करत असल्याचे दिसून आले. त्यांची चाहूल लागताच त्या इसमा समोरील दुसरा इसम पळून गेला. घटनास्थळावरील इसमाच्या हातातील कागदांची पाहणी केलीअसता त्यावर मुंबई मटका नावाचे आयताकृती पुस्तक त्यावर कार्बनव्दारे आकडेमोड केलेले दिसत होते, तसेच त्याच्या ताब्यात एक निळया रंगाचे बॉलपेन व रोख रक्कम रुपये २०८०/- मिळून आले. आरोपीने त्याचे नाव योगेश सत्यवान पवार रा.साळेल नांगरभाट ता. मालवण असे सांगितले. त्यांनी सर्व मुद्देमाल नि.क्र.पी२/पीडब्ल्यू३ च्या जप्ती पंचनाम्याने जप्त केला व नि.क्र.पी३/पीडब्ल्य३ च्या मुद्देमाल पावतीने पोलीस स्टेशन मध्ये जमा केला. त्यांचे तपासामध्ये आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

११. सदर साक्षीदाराने उलट तपासामध्ये तपासकामी छाप्याकामी जाताना त्याची नोंद डयुटी रजिष्टरला करावी लागते, ती डयुटी रजिष्टरची प्रत तपासकामी हजर केली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच छाप्याचे ठिकाण लोकवस्तीचा भाग असल्याचे व त्याने पोलीस कर्मचाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीचे तपास टिप्पण नोंदविले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांचे तपासामध्ये कोणत्या व्यक्तीने कोणत्या अंकारवर किती पैसे लावले हे निष्पन्न झालेले नाही असे मान्य केले आहे.

१२. कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा सिध्द होण्यासाठी आरोपी हा घटनेच्या दिवशी व वेळी मुंबई जुगार मटका नावाचा जुगार सार्वजनिक ठिकाणी पैशावर खेळत होता ही बाब सिध्द होणे आवश्यक आहे. कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा सिध्द होण्याकरीता अभियोगपक्षाने मुंबई मटका हा जुगार संधीवर आधारीत जुगार आहे ही बाब सुध्दा सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामातील पंच साक्षीदार फितूर झाल्यामुळे जप्त मुददेमाल आरोपीच्याच ताब्यातून जप्त करण्यात आलेबाबतचा घटनास्थळ

वजा जप्ती पंचनामा योग्यरित्या शाबीत झालेला नाही.

१३. आरोपीकडून रोख रक्कम, आकडेमोड केलेले पावती पुस्तक, पेन जप्त केल्याची बाब जरी खरी असली तरी एखादया व्यक्तीकडून काही रक्कम, आकडेमोड केलेले पावती पुस्तक जप्त करणे म्हणजे ती व्यक्ती जुगार खेळत होती असा निष्कर्ष काढणे योग्य नाही, तरी याबाबत आरोपी जुगार खेळत होता म्हणजे काय करत होता याबाबतचा पुरावा समोर येणे आवश्यक आहे. आरोपी हा लोकांच्याकडून पैसे घेवून कोणत्या अंकावर व किती रक्कमेचा जुगार खळत होता याचे स्पष्टीकरण अगर खुलासा करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपी हा मुंबई मटका नावाचा जुगार खेळत होता व तेथे उपस्थित काही लोकांची तपास टिप्पणे घेवून त्यांची साक्ष अभियोग पक्षाने घेणे आवश्यक होते परंतु तसे घडलेले नाही. आरोपी हा पैसे स्विकारुन मुंबई मटका नाच्या मटका जुगार खेळत असल्याचे पोलीस साक्षीदार सांगत नाही. याकामी तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविली नसल्यामुळे तपासकामामध्ये कोणत्या व्यक्तीने कुठल्या अंकावर किती पैसे लावले होते व आरोपीने कुठल्या व्यक्तीकडून किती पैसे स्विकारले होते हे त्यांच्या तपासामध्ये निष्पन्न झालेले नाही. यापूर्वी वर नमूद केल्यावर केवळ रोख रक्कम, पेन आकडे मोड केलेले पावती पुस्तक आढळणे म्हणजे जुगार खेळणे असा निष्कर्ष निघत नाही. घटनेच्या दिवशी खरोखरच पंच साक्षीदारामार्फत आरोपीस पकडून मुद्देमाल जप्त केला,तसेच जप्त केलेले साहित्य हे आरोपीच्या ताब्यातून जप्त केले या सर्व गोष्टीबाबत साशंकता निर्माण होते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

१४. अभियोग पक्षाचा पुरावा पाहता दि. २६/१२/२०२४ रोजीच्या कथित घटनेमध्ये आरोपीचा सहभाग सिध्द होत नाही. अभियोग पक्षाचा पुरावा अत्यंत त्रोटक व असमाधानकारक आहे. त्यामुळे आरोपीस संशयाचा फायदा देवून

निर्दोष मुक्त करणे उचित होईल. सदर कामी जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु. २०८०/– हे अपिल कालावधीनंतर सरकार जमा होणेबाबत व इतर मुद्देमाल मूल्यहिन असल्याने नष्ट करणेबाबत आदेश होणे आवश्यक आहे. सबब, उपलब्ध पुरावा व मुद्धा क्र. १ चा निष्कर्ष विचारात घेता मी मुद्दा क्र. २ च्या निष्कर्षाबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | आरोपी योगेश सत्यवान पवार याची कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपीचे व जामीनदाराचे जामीन व जात मुचलके रद्द करण्यात येत आहे |
| ३. | अपील कालावधीनंतर जप्त मुद्देमाल रोख रक्कम रु. २०८०/–सरकार जमा करणेत यावेत व इतर मुद्देमाल मुल्यहीन असल्याने त्याचा नाश करण्यात यावा. |
| ४. | आरोपीने कलम ४८१ भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ नुसार माननीय अपिलार्थी न्यायालयाने नोटीस निर्गमित करुन हजर राहण्यास आदेशित केल्यास अपिलार्थी न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबत १५,०००/– रुपयांचे वैयक्तीक बंधपत्र द्यावे. |
| | (खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय अधिघोषित.) |

सही/–

ठिकाण : मालवण — एम.के.फकीह
दिनांक : २५/०३/२०२६ — न्यायदंडाधिकारी वर्ग १, मालवण.